Level 4_Chauthee_listening Passage

# हत्ती

हत्तीचे पिल्लू बावीस महिन्यांनी जन्माला येते. पहिल्या तीन चार तासांनी आई पिल्लाला हळूहळू उभे राहायला शिकवते. सुरवातीला आपल्या सोंडेचे काय करावे ते त्याला कळत नाही, मग लहान मुले जशी तोंडात बोटे घालतात तसे आपल्याच सोंडेचे टोक ते तोंडात घालून बघते. साधारण तीन महिन्यात ते सोंडेने गवत उचलायला शिकते. हत्तीची पिल्ले एकमेकांवर गवत फेकणे, सोंडेने पाणी फवारणे, चिखलात खेळणे असे खेळ खेळतात..

हत्ती लहानपणापासून ज्या ज्या प्रदेशातून गेलेले असतात त्याचे नकाशे त्यांच्या मेंदूत नोंदवले जातात. त्याप्रमाणे ते प्रवास करतात. हत्तींचे अनेक कळप एकमेकांना भेटतात व बरोबर प्रवास करतात. शरीराच्या हालचालीतून, स्पर्शातून, वेगवेगळे आवाज काढून ते आपले विचार दुसऱ्यांना सांगतात. आपले सुळे एकमेकात अडकवून सोंडेने आपले प्रेम दाखवतात. हत्ती हा कळपात रहाणारा व कुटुंबात रमणारा असा शाकाहारी प्राणी आहे.

प्रश्न:–

१) हत्तीची आई आपल्या पिल्लाला केव्हा चालायला शिकवते?

२) हत्तीचे पिल्लू सोंडेच्या टोकाने काय करते?

३) हत्तीची पिल्ले कोणते खेळ खेळतात?

४) हत्ती आपले विचार दुसऱ्यांना कसे सांगतात?

५) हत्ती शाकाहारी प्राणी आहे की मांसाहारी?

Level 4_Chauthee_listening Passage

## युआन श्यांग

इ. स. ६३० च्या सुमारास युआन श्यांग हा चिनी प्रवासी भारतात आला त्याने बौद्ध धर्माचा अभ्यास केला होता. मूळ धर्मग्रंथांचा अभ्यास करावा म्हणून तो भारतात आला. दोन वर्षे काश्मीरमध्ये राहून त्याने अनेक धर्मग्रंथ वाचले. नंतर तो मगध देशातील (आजचे बिहार ) नालंदा विद्यापीठात आला. तेथे खूप मोठे ग्रंथालय होते. तेथे दहा हजार विद्यार्थांची रहाण्याची व शिकण्याची सोय होती. तेथील अनेक ग्रंथांचा त्याने चिनी भाषेत अनुवाद केला.

महाराष्ट्रात युआन श्यांगने अजिंठा व वेरुळ येथील सुंदर लेणी पाहिली. महाराष्ट्रातील लोकांविषयी तो म्हणतो,"संकटात सापडलेल्या माणसांना आपल्या प्राणांचीही पर्वा न करता ते मदत करतात". चीनमध्ये परत जातांना त्याने साडेसहाशे ग्रंथ व भगवान बुद्धाच्या अनेक मुर्ती आपल्याबरोबर नेल्या. त्या काळात तो भारतात पंधरा वर्षे राहिला. चीनमध्ये गेल्यावर त्याने बरोबर आणलेल्या संस्कृत ग्रंथांचे चिनी भाषेत भाषांतरे केली. 'पश्चिम देशाची कथा' ह्या नावाचे पुस्तक लिहीले. त्यात भारतातील प्रवासाचे वर्णन आहे.

प्रश्न:–

१) युआन श्यांग कोणत्या देशाचा प्रवासी होता?

२) हा भारतात कशासाठी आला होता?

३) नालंदा येथे त्याने काय केले?

४) महाराष्ट्रात त्याने काय पाहिले?

५) चीनमध्ये आपल्याबरोबर तो काय घेऊन गेला?

Level 4_Chauthee_Reading Passag

# झाडे सजीव असतात

झाडे सजीव असतात हे जगदीशचंद्र बोस ह्यांनी सिध्द केले. झाडांची रोपे बियांपासून तयार होतात. रोपांची वाढ होऊन मोठी झाडे बनतात. झाडे `हालचाल करतात पण त्या हालचाली सहज लक्षात येत नाहीत. कळीचे फूल होताना मिटलेल्या पाकळ्या उघडतात. झाडांची मुळे जमिनीत जातात. त्यामुळे झाडे प्राण्यांप्रमाणे इकडे तिकडे जाऊ शकत नाहीत.

झाडांच्या वाढीला योग्य तेवढे खत व पाण्याची गरज असते. झाडांची मुळे जमिनीतून पाणी शोषून घेतात. हे पाणी झाडांच्या पानांपर्यंत पोचते. पानावर छोटी छोटी छिद्रे असतात्त. त्यातून हवा पानांच्या आत शिरते. पानावर सूर्यप्रकाश पडला की हवा आणि पाणी यांपासून झाडे आपले अन्न तयार करतात.

प्रश्न:–

१) झाडे सजीव असतात असे कोणी सिध्द केले?

२) झाडे का चालू शकत नाहीत?

३) झाडांच्या वाढीला कशाची गरज असते?

४) झाडे पाणी कुठून घेतात?

५) झाडांना आपले अन्न तयार करण्यासाठी काय काय लागते?

Level 4_Chauthee_Reading Passage

# पोळा

दिवाळी, दसरा, मकर संक्रांत, होळी हे सण आपण साजरे करतो. शेतकरी एक सण बैलांसाठीही साजरा करतो, तो म्हणजे पोळा. या दिवशी बैलांकडून काम करून घेत नाहीत. हा सण श्रावण महिन्यातल्या अमावस्येला साजरा करतात.

या दिवशी सकाळी बैलांना आंघोळ घालतात, त्यांच्या शिंगांना रंग लावतात व फुगे बांधतात. पोटावर चित्रे काढतात, अंगावर विणलेल्या शाली टाकतात. गळ्यात घुंगरांच्या माळा घालतात. नंतर बैलांना हळदिकुंकू लावून त्यांची पुजा करतात व ओवाळतात. गावातील सगळे बैल मैदानात जमतात. त्यांच्या समोर लेझीम, ढोल, ताशा, बॅन्ड वाजवत गावातून त्यांची मिरवणुक काढतात. नंतर घरी आल्यावर त्यांना पुरण पोळी खायला देतात. पोळा हा शेतकऱ्यांचा आवडता सण आहे.

प्रश्न:–

१) पोळा हा सण कोणासाठी साजरा करतात?

२) हा सण केंव्हा साजरा करतात?

३) या दिवशी बैलांना कसे सजवतात?

४) बैलांच्या मिरवणुकीचे वर्णन करा.

५) या दिवशी बैलांना काय खायला देतात?